| CNR No.MHWR040005322025 | दाखल तारिख | २८/०३/२०२५ |
|---|---|---|
| | नोंदणी तारिख | २८/०३/२०२५ |
| | निकाल तारिख | १८/०७/२०२६ |
| | कालावधी | ०१ वर्षे, ०३ म, २० दि. |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांकः १८/०७/२०२६)

आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई)(एफ) ८३ अन्वये अपराधाच्या आरोपांसाठी सदरचा खटला करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा तसेच आरोपींतर्फे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, दि.०९/०९/२०२४ रोजी वेळ १३.०० ते १३.४० वाजताच्या दरम्यान मौजा बोरी शेतशिवारातील बोर टायगर रिसोर्टच्या पाठीमागे बोर नदीचे काठावर, ता. सेलू, जिल्हा–वर्धा येथे आरोपींच्या ताब्यातुन अवैधरित्या व विना परवाना २४०० लिटर कच्चा रसायन सडवा, ०५ प्लास्टीक डबकीत १०० लिटर गावठी मोहा दारु, ०५ नग प्लास्टीक डबकी, १८ नग लोखंडी ड्रम व दारु भट्टीचे इतर साहित्य अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आले, म्हणून आरोपींनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) ८३ अंतर्गत गुन्हा केला आहे ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी हे आपसी संगनमताने बोर नदीच्या काठावर झाडाझुडपामध्ये गावठी मोहा दारुच्या हातभट्टीकरिता कच्चा मोहा रसायन सडवा तयार करीत असतांना मिळुन आले, म्हणून आरोपींनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(एफ) ८३ अंतर्गत गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त केले.** |

## :: कारणमीमांसा ::

३. अभियोग पक्षाने आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार नरेंद्र गजानन तेलरांधे यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे नोंदविली. पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्यात अभियोगपक्षाला यश आले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपींविरूध्द गुन्ह्या संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे आरोपींची जबानी नोंदविण्यात आली नाही.

**मुद्दे क्र. १ व २ करीता** :

४. अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई)(एफ) ८३ प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी, आरोपी हे आपसी संगनमताने बोर नदीच्या काठावर झाडाझुडपामध्ये गावठी मोहा दारुच्या हातभट्टीकरिता कच्चा मोहा रसायन सडवा तयार करीत असतांना मिळुन आले तसेच आरोपींच्या ताब्यातुन अवैधरित्या व विना परवाना २४०० लिटर कच्चा रसायन सडवा, ०५ प्लास्टीक डबकीत १०० लिटर गावठी मोहा दारु, ०५ नग प्लास्टीक डबकी, १८ नग लोखंडी

ड्रम व दारु भट्टीचे इतर साहित्य अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आले, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. त्या अनुषंगाने अभियोगपक्षाने पंच साक्षीदार नरेंद्र गजानन तेलरांधे यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे तपासले. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, पोलीसांनी त्यांना दिनांक ०९/०९/२०२४ रोजी पंचनामा करण्याकरिता बोलविले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्यांच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी त्यांची एका लिहिलेल्या कागदावर सही घेतली. त्यांना सदरचा मौकाजप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांची सही ओळखली, परंतू त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी त्यांना परवानगीनंतर उत्तर सूचक प्रश्न विचारले असता त्यांनी नाकारले की, दिनांक ०९/०९/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना बोरधरणवरुन बोर टायगर रिसोर्ट, शेतशिवारातील बोर नदीच्या काठावर, ता.सेलू व जि.वर्धा येथे पंच म्हणून बोलविले होते. घटनास्थळी आरोपी हे गावठी मोहा रसायन सडवा तयार करतांना दिसुन आल्याने पोलीसांनी त्यांच्या समक्ष त्यांचे नाव विचारले. पोलीसांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून २४०० लिटर कच्चा रसायन सडवा, ०५ प्लास्टीक डबकीत १०० लिटर गावठी मोहा दारु, ०५ नग प्लास्टीक डबकी, १८ नग लोखंडी ड्रम व दारु भट्टीचे इतर साहित्य जप्त केली व त्याबाबत मौकाजप्ती पंचनामा तयार केला. पोलीसांनी मौकाजप्ती पंचनामा घटनास्थळावर तयार केला व त्यावर त्यांनी वाचून व समजून सही केली. जप्त मालापैकी गावठी मोहा रसायन सडवा व गावठी मोहा दारु वेगळी काढुन दोन १८० मि.लि.च्या शिश्यात सी.ए. परिक्षणाकरिता घेतली व त्यावर त्यांची, दुसरा पंच, आरोपी व पोलीसांच्या सहीचे लाखेने डबल सील केले.

६. सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल असला तरी तो अहवाल जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाबाबतचा आहे, तसेच नमुन्यासाठी जप्त

मुद्देमालापैकी वेगळा काढण्यात आला होता, इत्यादी बाबी सांगणा–या कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. सी.ए. सॅम्पल काढून नागपूर येथील न्यायवैदयक प्रयोगशाळा येथे सिल करून सुरक्षितपणे पोहचविले याबाबतचा कुठलाही पुरावा अभिलेखावर अभियोग पक्षाने आणलेला नाही. सबब, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा घटनास्थळावरून जप्त करण्यात आला, ही बाब पुराव्या अभावी सिध्द होवू शकली नाही.

७. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने फिर्यादी व तपासी अंमलदार तपासलेले नाहीत. अभियोग पक्षाने आरोपींवरील विषयांकित गुन्हे सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने मौकाजप्ती पंचनामा सिध्द करण्यासाठी जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदाराला तपासले, परंतु त्यांची साक्ष आरोपींवरील विषयांकित गुन्हा सिद्ध करण्यासाठी पुरेशी नाही. तसेच, मौकाजप्ती पंच साक्षीदाराने जप्ती पंचनाम्याबाबत काहीही सांगितले नाही. त्यामुळे मौकाजप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. अशा परिस्थितीत आरोपी हे आपसी संगनमताने बोर नदीच्या काठावर झाडाझुडपामध्ये गावठी मोहा दारुच्या हातभट्टीकरिता कच्चा मोहा रसायन सडवा तयार करीत असतांना मिळुन आले तसेच आरोपींच्या ताब्यातुन अवैधरित्या व विना परवाना २४०० लिटर कच्चा रसायन सडवा, ०५ प्लास्टीक डबकीत १०० लिटर गावठी मोहा दारु, ०५ नग प्लास्टीक डबकी, १८ नग लोखंडी ड्रम व दारु भट्टीचे इतर साहित्य अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आले, ही बाब सिध्द झालेली नाही.

८. त्यामुळे संचीकेवरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन करता अभियोग पक्षाने आरोपींविरूध्दचा महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई)(एफ) ८३ चा गुन्हा आरोपींनी केल्याचे सिध्द केलेले नाही या निष्कर्षावर मी पोहोचले आहे. करीता मी मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u> :**

९. अपराध क्रमांक ७४०/२०२४ मधील जप्त मुद्देमाल जागीच पंचासमक्ष

नाश केल्यामुळे त्याबाबत कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही. वरील मुद्यांचा नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी हे ठेवलेल्या आरोपांमधुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी क्र.१ **सलमान ईसराईल पठाण** व आरोपी क्र.२ **महेश अमृतराव बंडीवार** यांची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई)(एफ), ८३ अन्वयेच्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१)] अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) अपराध क्रमांक ७४०/२०२४ मध्ये भरलेली सुरक्षा राशी रक्कम जर असेल तर आरोपींना अपिल कालावधी संपल्यानंतर परत करण्यात यावी.

४) आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ] प्रमाणे प्रत्येकी रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.07.18 16:58:01 +0530

**(एस.आर.सातभाई)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सेलू, जिल्हा–वर्धा

**दिनांक** : १८/०७/२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)